# विभाग १ : राजकीय संकल्पना

## प्रस्तावना



आपण आपले कुटुंब, समाज, प्रदेश, देश इत्यादींबाबत बोलत असतो. त्यांतील काही सामाजिक, तर काही राजकीय स्वरूपाच्या संस्था आहेत. राजकीय संस्था या शासनाशी संबंधित असतात. त्यात संसद, मंत्रिमंडळ, न्यायमंडळ इत्यादींचा समावेश होतो. आपण एका देशाचे नागरिक म्हणून आपल्याला काही हक्क असतात आणि आपली काही कर्तव्येदेखील असतात. ती संविधानात आणि कायद्यात नमूद केलेली असतात. आपण हे नियम पाळणे अपेक्षित असते. एखाद्या परदेशी व्यक्तीलादेखील तो ज्या देशात राहतो, तेथील नियम पाळावे लागतात.

एक नागरिक म्हणून आपण काही प्रश्नांना सामोरे जात असतो. मी राज्याच्या नियमांचे पालन का करावे? वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कोणत्या मर्यादा असतात ? मला न्याय कुठे मिळू शकतो? अनेक विचारवंतांनी यांसारख्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्ती आणि राज्यसंस्था (शासन) यांच्यातील संबंध समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

समाजात आणि राज्यसंस्थेत व्यक्तीचे कार्य काय असावे हे समजण्यासाठी विचारवंतांनी आपले विचार मांडले आहेत. आपण भारतीय विचारवंत पाहिले तर 'कौटिल्य' यांचे राज्यसंबंधांबाबत, महात्मा गांधींचे स्वराज या विचाराबाबत किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय यांची उदाहरणे देऊ शकतो. तसेच पाश्चिमात्य विचारवंतांमध्ये नागरिकत्वाबाबत ॲरिस्टॉटल, लॉक यांचा हक्कांबाबतचा सिद्धान्त, स्वातंत्र्याबाबतचे मिलचे विचार, कम्युनिझमबाबत मार्क्स यांची मांडणी किंवा जॉन रॉल्स यांचे न्यायाच्या सिद्धान्तावरील विश्लेषण ही उदाहरणे घेता येतील. या व इतर विचारवंतांच्या योगदानाच्या आधारेच आपण स्वातंत्र्य, समता, न्याय, लोकशाही इत्यादी संकल्पनांचा अर्थ समजू शकतो. राजकीय विचारांच्या विश्लेषणांच्या आधारेच आपल्याला राजकीय सिद्धान्तांचा आणि संकल्पनांचा अभ्यास करता येतो.

या विभागामध्ये आपण काही महत्त्वाच्या राजकीय संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. त्यात स्वातंत्र्य, समता, हक्क आणि न्याय तसेच राष्ट्र व राष्ट्रवाद या संकल्पना आहेत.

या भागातील तीन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत :

**प्रकरण १. राज्य :** राष्ट्र, राष्ट्रवाद, राज्य आणि शासन या संकल्पनांवर या प्रकरणात चर्चा केली आहे. या संकल्पनांदरम्यानचे संबंध समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण २. स्वातंत्र्य आणि हक्क :** या प्रकरणात स्वातंत्र्य आणि हक्क या संकल्पना सांगितल्या आहेत. या संकल्पना समाजातील व्यक्तीच्या स्थानाबाबत आहेत.

**प्रकरण ३. समता आणि न्याय :** हे प्रकरण समता आणि न्याय यांवर लक्ष केंद्रित करते. या संकल्पनांचा संबंध सामाजिक व्यवस्थेशी येतो.

या सर्व संकल्पनांची चर्चा भारताच्या संदर्भात देखील केली गेली आहे.

# १. राज्य

आपण शाळेत नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्राचा अभ्यास केला आहे. नागरिकशास्त्राचा रोख हा नागरिकांवर होता, तर राज्यशास्त्राचा राज्य, सरकार आणि प्रशासन इत्यादींवर होता. या प्रकरणात आपण राज्यशास्त्राच्या काही मूलभूत संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. या संकल्पना म्हणजे राष्ट्र, राष्ट्रवाद, राज्य आणि शासनसंस्था.

**खालील वाक्ये वाचा.**

(१) माझा एक मित्र पंजाबी तर दुसरा मणिपुरी आहे.

(२) माझे दोन वर्गबंधू इराणी आहेत.

(३) आम्ही रोज राष्ट्रगीत म्हणतो. मला आपल्या राष्ट्रगीताचा अभिमान आहे.

(४) मला शासकीय कार्यालयात जाऊन माझा जन्मदाखला घ्यायचा आहे.

वरील प्रत्येक वाक्य कोणत्यातरी निश्चित घटकाशी संबंधित आहे. पहिले वाक्य त्या व्यक्तीची ओळख सांगते. ही ओळख म्हणजे एखादी व्यक्ती ही पंजाबी, तमिळ, मराठी, तेलुगु इत्यादी असल्याची ओळख आहे. ही त्या व्यक्तीची प्रादेशिक पातळीवरची ओळख आहे. दुसरे वाक्य ती व्यक्ती कोणत्या देशाची आहे हे दाखवते. ती व्यक्ती इराणी, श्रीलंकन, अमेरिकन इत्यादी असू शकते. त्या व्यक्तीचे ते राष्ट्रीयत्व असते. राष्ट्रगीताबाबतचे वाक्य हे त्या राज्याच्या संदर्भातील आहे. आपल्याला राष्ट्रगीताबाबत अभिमान आहे हे राष्ट्रवादाच्या भावनेचे प्रतीक आहे. जन्माचा दाखला घेणे ही शासनसंस्थेच्या संदर्भातील बाब आहे. या सर्व संकल्पनांचा आपण या प्रकरणात अभ्यास करणार आहोत.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

आपण भारत, पाकिस्तान, चीन इत्यादींचा उल्लेख करताना 'देश' हा शब्द वापरतो. कधी कधी आपण त्यांना 'राष्ट्र' किंवा 'राज्य' म्हणून देखील संबोधित करतो. या सगळ्या शब्दांचा अर्थ जरी सारखा असला तरी तांत्रिकदृष्ट्या या शब्दांमध्ये फरक आहे. सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक, भाषिक, ऐतिहासिक पातळीवर समानता असेल तर मानसिक पातळीवर ऐक्याची भावना तयार होते. अशा वेळी त्याला 'राष्ट्र' म्हणून संबोधले जाते. एखाद्या राष्ट्राला राज्य होण्यासाठी पुढील घटकांची आवश्यकता असते : सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनसंस्था, निश्चित भूप्रदेश आणि लोकसंख्या. प्रत्यक्षात रोजच्या व्यवहारात आपण सार्वभौम शासनसंस्था असलेल्या स्वतंत्र देशाचे वर्णन करताना 'राज्य' या शब्दाऐवजी 'राष्ट्र' हा शब्दप्रयोग करतो. राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास करताना मात्र आपण सार्वभौम शासनसंस्था असलेल्या देशाला 'राज्य' असे संबोधतो.

## राष्ट्र

राष्ट्र म्हणजे काय? सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीवर स्वतःची समान ओळख असणारे लोक आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्याला 'राष्ट्र' असे म्हणतात. सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक, भाषिक, ऐतिहासिक इत्यादी पातळींवर इथे एक भावनिक एकात्मतेची जाणीव असते. हे लोक एका निश्चित भौगोलिक प्रदेशात राहत असतीलच असे नाही.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

राष्ट्र या शब्दाला इंग्रजीत Nation असे म्हणतात. Nation या शब्दाचे मूळ लॅटिनमधील Nasci या शब्दात आहे. Nasci चा अर्थ 'जन्माला येणे' असा आहे. म्हणूनच असे मानले जाते की एखाद्या राष्ट्राच्या लोकांमध्ये वांशिक आणि सांस्कृतिक संबंध आहेत.

**अर्नेस्ट बार्कर यांनी राष्ट्राची केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे :**

एका निश्चित प्रदेशात, जरी वेगवेगळ्या वंशांचे लोक असले तरी ऐतिहासिक परंपरेद्वारे समान विचार आणि भावना, समान धर्म आणि भाषा असलेले लोक म्हणजे राष्ट्र.

### राष्ट्राची वैशिष्ट्ये काय आहेत ?

(i) **लोकसंख्या :** राष्ट्राला लोकसंख्या असणे आवश्यक आहे. या लोकांमध्ये आपापसात काही साम्य असते. हे साम्य भाषिक, वांशिक, धार्मिक तसेच समान ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक पातळीवरील अनुभवातून येऊ शकते. या वांशिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ऐक्याच्या दृष्टिकोनातून आपण एक राष्ट्र आहोत, हा समज निर्माण होतो.

(ii) **सामुदायिक ऐक्याची भावना :** लोकांमधील सांस्कृतिक समानतेतून, आपण एक असल्याची मानसिकता निर्माण होते. हा भावनिक पातळीवरचा विचार आहे. त्या समुदायाचा हा दृष्टिकोन आहे.

(iii) **राजकीय वेगळेपण :** सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक किंवा भाषिक समानता असलेले लोक जेव्हा एका निश्चित भूप्रदेशात राहतात तेव्हा त्यांच्यात आपण राजकीय पातळीवर वेगळे व्हावे ही भावना निर्माण होते. स्वयंनिर्णयाच्या जाणिवेतून हे विचार पुढे येतात. यातूनच राजकीय पातळीवरील स्वशासनाची मागणी निर्माण होऊ शकते.

### राष्ट्रवाद

भारताला ब्रिटिश वसाहतवादापासून स्वातंत्र्य हवे होते. हा राजकीय स्वयंनिर्णयाचा लढा होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातून भारतीय राष्ट्रवादाची भावना व्यक्त होत होती.

राष्ट्रवाद ही एक प्रकारची राजकीय अस्मिता असते. ते आपल्या राष्ट्रावरचे प्रेम असते. लोक आपल्या राष्ट्राशी भावनिक पातळीवर जोडलेले असतात. या बंधनातून त्यांच्यात स्वत:ची ओळख आणि अभिमान निर्माण होतो आणि आपल्या राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा निर्माण होते. या भावनांचे प्रदर्शन आपल्याला अनेक प्रसंगांतून दिसून येते. उदा., आपल्या राष्ट्राच्या क्रिकेट टीमचा जयजयकार करताना, राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहताना किंवा युद्धादरम्यान आपल्या सेनादलाला पाठिंबा देताना. राष्ट्रवाद हा लोकांना देशाशी राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती आहे.



राष्ट्रवाद

### राष्ट्रवादाची काही वैशिष्ट्ये :

(i) राष्ट्रवाद ही एक अशी शक्ती आहे की जी एकता निर्माण करू शकते. तसेच ती एखाद्या गोष्टीचा नाश देखील करू शकते. त्याचे

प्रागतिक राष्ट्रवाद आणि आक्रमक राष्ट्रवाद असे वर्णन केले जाते. समाजाला एकत्रित करून विकास साध्य करण्याची क्षमता प्रागतिक राष्ट्रवादामध्ये असते, तर आक्रमक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ व दुरावा निर्माण करतो.

(ii) राष्ट्रवाद हा साम्राज्यवाद किंवा वसाहतवादविरोधी असतो. कोणत्याही क्षेत्रावर परकीय ताबा असण्याच्या तो विरोधात असतो. जगातील स्वातंत्र्याचे लढे या संकल्पनेतून निर्माण होताना दिसून येतात. राष्ट्रवाद हा स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार करतो.

(iii) राष्ट्रवाद विविधतेला प्रोत्साहन देऊ शकतो. भारतात धार्मिक, वांशिक, भाषिक, प्रादेशिक इत्यादींची विविधता दिसून येते. तरीही आपण भारतीय राष्ट्रवादाबाबत बोलतो. 'विविधतेत एकता' हा भारताच्या राष्ट्रवादाचा गाभा आहे.

**चर्चा करा.**

जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकातील 'भारतमाता' आणि 'भारतातील विविधता आणि एकता' ही प्रकरणे वाचा. नेहरूंच्या लिखाणाच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादावर चर्चा करा.

राष्ट्रवादाकडे जेव्हा आपण राजकीय दृष्टिकोनातून बघतो तेव्हा त्याचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात.

(i) **उदारमतवादी राष्ट्रवाद :** उदारमतवादी राष्ट्रवादाचा उगम हा फ्रेंच राज्यक्रांतीत झाला. राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्या 'चौदा मुद्द्यां'मध्ये देखील हा दिसून येतो. राष्ट्र आणि सार्वभौमत्वाची सांगड राष्ट्रवाद घालून देतो. प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचा अधिकार आहे, हे उदारमतवादी राष्ट्रवाद मानतो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

पहिल्या महायुद्धानंतर युरोप, अमेरिका आणि जगात चिरकालीन शांतता आणि स्थैर्य निर्माण व्हावे यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी चौदा मुद्द्यांची मांडणी केली.

(ii) **परंपरावादी राष्ट्रवाद :** हा राष्ट्रवाद समाजाला अंतर्मुख करणारा आहे. राष्ट्र आणि समाज यांचे संबंध अतिशय जवळचे आहेत असे तो मानतो. स्वदेशाभिमानाला हा राष्ट्रवाद खूप महत्त्व देतो.

(iii) **प्रसारवादी राष्ट्रवाद :** हा राष्ट्रवाद आक्रमक स्वरूपाचा असतो. 'राष्ट्रीय गौरवा'साठी राष्ट्रे आक्रमक होतात आणि साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. वसाहतवाद हे प्रसारवादी राष्ट्रवादाचे एक उदाहरण आहे.

(iv) **वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद :** हा राष्ट्रवाद राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात बघितला जातो. भारताच्या स्वातंत्र्यादरम्यान भारताने या राष्ट्रवादाचा अनुभव घेतला आहे.

### राज्य

भारताच्या संविधानाच्या सरनाम्यात 'सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक' असे शब्दप्रयोग आहेत. इथे सार्वभौमत्व म्हणजे राष्ट्राला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार आहे, हे अभिप्रेत आहे. म्हणजेच, हे राष्ट्र कोणत्याही इतर राष्ट्रांवर निर्णय घेण्याबाबत अवलंबून नाही. हे राष्ट्र स्वतःचे निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकते तसेच त्याला आपले कायदे करण्याचा आणि राज्य करण्याचा अधिकार आहे. जेव्हा एखादे राष्ट्र सार्वभौम होण्याची इच्छा दर्शवते तेव्हा ते स्वयंनिर्णयाच्या हक्काची मागणी करत असते.

## राज्याच्या काही व्याख्या

**ॲरिस्टॉटल :** राज्य हा परिपूर्ण आणि स्वावलंबी आयुष्य असलेल्या कुटुंबांचा आणि खेड्यांचा संघ असतो. यात आनंदी आणि प्रतिष्ठित आयुष्य असणे अपेक्षित आहे.

**जाँ बोडीन :** राज्य हे कुटुंबांचे असे संघटन आहे, की ज्यात कुटुंबे आणि त्यांच्या मालकीची साधने सर्वोच्च शक्तीने तसेच तर्काने शासित असते.

**वूड्रो विल्सन :** एका विशिष्ट भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटित केलेले लोक म्हणजे राज्य होय.

**हॅरॉल्ड लास्की :** वाटून दिलेल्या भौतिक क्षेत्रात, सर्व संस्थांवर श्रेष्ठत्वाचा दावा करणारे लोक आणि शासन यांत विभागलेला भूप्रदेशात्मक समाज म्हणजे राज्य होय.



ॲरिस्टॉटल
(३८४ BCE-३२२ BCE)
प्राचीन ग्रीक तत्वज्ञ, अभ्यासक



जाँ बोडीन
(१५३०-१५९६)
फ्रेंच कायदेपंडित आणि विचारवंत



वूड्रो विल्सन
(१८५६-१९२४)
अमेरिकन मुत्सद्दी आणि अभ्यासक तसेच अमेरिकेचे अठ्ठाविसावे राष्ट्राध्यक्ष



हॅरॉल्ड लास्की
(१८९३-१९५०)
ब्रिटिश राजकीय विचारवंत

राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काचा आग्रह हा एखाद्या राष्ट्राला राज्याच्या दिशेने घेऊन जातो. एखादे राष्ट्र, राज्य केव्हा होते? राष्ट्राला राज्याचा दर्जा प्राप्त होण्यासाठी सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनव्यवस्था, भूप्रदेश आणि लोकसंख्या हे घटक आवश्यक असतात.

राज्याला राजकीय समुदाय म्हणून संबोधित केले जाते. राज्याचे अस्तित्व आपल्याला सातत्याने जाणवत असते. शिक्षण, समाजकल्याण, संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था यांसारखी कार्ये राज्य करत असते. त्याचबरोबर जन्म-मृत्यूची नोंदणी, पॅन कार्ड किंवा आधार कार्ड मिळवणे, लग्नाची नोंदणी यांसारखी वैयक्तिक कार्येदेखील राज्यातर्फे केली जातात. राज्य हे हक्क प्रदान करते, न्याय देते, समानता ठेवते आणि स्वातंत्र्याची हमी देते.

### राज्याचे घटक

(i) **सार्वभौमत्व :** कधी कधी सार्वभौमत्व हा स्वातंत्र्य या शब्दाऐवजी देखील वापरला जातो. सार्वभौमत्व हा कायद्याच्या चौकटीतील शब्द आहे, तर स्वातंत्र्य या शब्दाचे स्वरूप राजकीय आहे. राज्य हे कायदेशीरदृष्ट्या सार्वभौम असते आणि त्याला स्वतःचे संविधान असते. उदा., भारत १९४७ साली राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला आणि १९५० साली संविधान अमलात आणल्यानंतर सार्वभौम राज्य झाले.

(ii) **शासनसंस्था :** प्रत्येक सार्वभौम राज्याला स्वतःची शासनसंस्था असणे आवश्यक असते. शासन हे सार्वभौम आणि स्वतंत्र असणे गरजेचे आहे. उदा., ब्रिटिश राजवटीत भारतात शासनव्यवस्था होती, परंतु ती स्वतंत्र व सार्वभौम नव्हती. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी भारत हे राज्य नव्हते.

राज्याच्या संस्था या सार्वजनिक स्वरूपाच्या असतात. या सार्वजनिक संस्थांमध्ये कार्यकारी मंडळ,

कायदेमंडळ व न्यायमंडळ, नोकरशाही इत्यादी शासनव्यवस्थेच्या घटकांचा समावेश होतो. धोरणनिर्मिती, कायदे करणे, निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी ही जबाबदारी सार्वजनिक संस्थांची असते. आपण सार्वजनिक संस्था आणि खासगी संस्था यांत फरक करतो. खासगी संस्था या नागरी समाजाचा भाग असतात. उदा., खासगी व्यवसाय, मंडळ इत्यादी. त्यात सार्वजनिक संस्थांनाच राज्याच्या नावे कार्य करण्याची अधिमान्यता असते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

सर्व नागरिक हे राज्याचे सभासद असतात. राज्याचे निर्णय जनहिताच्या दृष्टीने होत असतात. निर्णय घेण्याच्या अधिकाराला अधिमान्यता असे म्हणतात. राज्याला जनहितासाठी निर्णय घेण्याची अधिमान्यता असते.

(iii) **भूप्रदेश :** राज्याच्या सीमेअंतर्गत असलेला भौगोलिक प्रदेश म्हणजेच भूप्रदेश होय. राज्याला निश्चित भूप्रदेश असणे आवश्यक आहे. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे त्याला त्याचे अधिकार क्षेत्र म्हणतात. अधिकार क्षेत्राबाबत राज्याला निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार असतो.

**भूप्रदेश म्हणजे काय?**

भूप्रदेशाचे तीन घटक असतात : (i) राष्ट्रीय सीमांतर्गत असलेली प्रत्यक्ष भूमी (ii) किनारपट्टीलगतचा सागरी प्रदेश हा किनारपट्टीपासून 12 नॉटिकल मैल (22.2 किमी किंवा 13.8 मैल) असतो. (iii) आपल्या भूप्रदेशावरील आकाशाचा भाग. (आकाशात किती उंचीपर्यंत आपला प्रदेश असेल याबाबत आंतरराष्ट्रीय कायद्यात उल्लेख नाही.)

(iv) **लोकसंख्या :** राज्याच्या अस्तित्वासाठी लोक आवश्यक असतात. लोकांमध्ये कोणत्याही प्रकारची विविधता असू शकते. ती भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक इत्यादी स्वरूपाची असू शकते. म्हणजेच एखाद्या राज्यात अनेक 'राष्ट्रांचा' समावेश असू शकतो. उदाहरणार्थ, सोव्हिएट रशियात अनेक राष्ट्रीय लोकांचा समावेश आहे. उदाहरणार्थ, रशियन लिथुआनियन, लाटवियन, इस्टोनियन, युक्रेनियन इत्यादी. तसेच युनायटेड किंग्डममध्ये इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या राष्ट्रांचा समावेश होतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**पॅलेस्टाईन :** पॅलेस्टाईनच्या जनतेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेला (PLO) मान्यता आहे. त्यांनी गाझा आणि वेस्ट बँक हा प्रदेश पॅलेस्टाईनचा भूप्रदेश म्हणून जाहीर केला आहे. परंतु पॅलेस्टाईनचे सार्वभौम सरकार नाही. हा प्रदेश इस्राएलच्या अधिकारक्षेत्रात येतो. म्हणून पॅलेस्टाईन हे राष्ट्र आहे पण राज्य नाही. परंतु २०१२ सालापासून पॅलेस्टाईनला संयुक्त राष्ट्रांत 'सभासद नसलेला निरीक्षक' दर्जा देण्यात आला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या शंभरहून अधिक राष्ट्रांनी पॅलेस्टाईनला राज्याचा दर्जा दिला आहे.

**करून पहा :** राष्ट्र आणि राज्याच्या वैशिष्ट्यांमधील समानता आणि फरक दाखवणारा तक्ता तयार करा.

### राज्य आणि शासनसंस्था

आपण साधारणतः राज्य आणि सरकार या शब्दांचा प्रयोग करताना त्यांतील फरक लक्षात घेतोच असे नाही. या दोन्ही वेगवेगळ्या संकल्पना आहेत. सर्वसामान्य जनतेच्या गरजा भागवण्यासाठी निर्माण केलेल्या राजकीय संस्था म्हणजे राज्य होय. राज्याचा जो काही संकल्प आहे त्याला आकार देणे, तो

व्यक्त करणे आणि तो प्रत्यक्षात आणण्याचे कार्य त्या राज्याचा प्रतिनिधी म्हणून शासन करत असते.

शासनसंस्था हा राज्याचा एक मुख्य घटक आहे. त्याचे मुख्य स्वरूप हे प्रशासकीय असते. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, जनकल्याण इत्यादी राज्याची महत्त्वाची कार्ये असतात. ही कार्ये शासनामार्फत केली जातात. शासनसंस्थांची तीन अंग असतात. कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ. शासनसंस्था या संकल्पनेबाबत अधिक विस्तृत माहिती या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दिली आहे.

**राज्य आणि शासनसंस्था यांच्यातील काही फरक**

| राज्य | शासनसंस्था |
|---|---|
| राज्य ही अमूर्त स्वरूपाची संकल्पना आहे. | शासनसंस्था मूर्त स्वरूपाची असते. |
| शासनसंस्थेपेक्षा राज्याचे स्वरूप अधिक व्यापक आहे. त्यात सर्व सार्वजनिक संस्था तसेच समाजातील सर्वांचाच नागरिक म्हणून समावेश होतो. | शासनसंस्था हा राज्याचा एक भाग आहे. |
| राज्य हे कायमस्वरूपी असते. | शासनसंस्था ही निश्चित कालावधीसाठी असते. शासनव्यवस्थेत बदल होऊ शकतो. सरकार बदलू शकते. |
| राज्य हे व्यक्तिनिरपेक्ष असते. ते राजकीयदृष्ट्या तटस्थ असते. | शासनसंस्थेला विचारप्रणालीवर आधारित अजेंडा असतो. त्यानुसार त्यांना धोरणांची अंमलबजावणी करायची असते. |
| राज्य हे सार्वभौम असते. | शासनाला राज्याकडून अधिकार प्राप्त होतात. राज्याच्या अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी शासनसंस्था करते. |

आपण या प्रकरणात राष्ट्र, राष्ट्रवाद, राज्य आणि शासनसंस्था या संकल्पनांचा अभ्यास केला. पुढील दोन प्रकरणात आपण स्वातंत्र्य, हक्क, समानता आणि न्याय या संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. या संकल्पना राज्याच्या कार्याशी निगडित आहेत.

**Please see the following websites for further information:**

**The Discovery of India**

Jawaharlal Nehru *The Discovery of India* (Delhi : Oxford University Press, 1985 )
Chapter: 'Bharat Mata' Page: 59
Chapter: The Variety and Unity of India Page: 61

https://archive.org/stream/TheDiscoveryOfIndia-Eng-JawaharlalNehru/discovery-of-india_djvu.txt

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. इंग्रजीतील Nation हा शब्द लॅटिन शब्द ......... पासून निर्माण झाला आहे.
(Nasci, Natio, Natalis, Nauto)

२. उदारमतवादी राष्ट्रवादाचा उगम हा .......... राज्यक्रांतीत झाला.
(अमेरिकन, रशियन, फ्रेंच, ब्रिटिश)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) ॲरिस्टॉटल - जर्मन विचारवंत
(ii) जाँ बोडीन - फ्रेंच विचारवंत
(iii) वूड्रो विल्सन - अमेरिकन विचारवंत
(iv) हॅरॉल्ड लास्की - ब्रिटिश विचारवंत

**(क) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. लोकांना देशाशी राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती -

२. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे -

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. प्रागतिक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.

२. सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार

३. पॅलेस्टाईन हे राज्य आहे.

४. प्रसारवादी राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रवादाचा प्रकार आहे.

**प्र.३ आपले मत नोंदवा.**

भारत एक राज्य आहे.

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. राष्ट्राची वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

२. राष्ट्रवाद म्हणजे काय हे सांगून त्याचे विविध प्रकार स्पष्ट करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

राज्याचे खालील घटक स्पष्ट करा.
(अ) सार्वभौमत्व (ब) शासनसंस्था
(क) लोकसंख्या (ड) भूप्रदेश

**उपक्रम**

सर्वांत लहान भूप्रदेश व सर्वांत मोठा भूप्रदेश असलेली राज्ये जगाच्या नकाशा आराखड्यात दर्शवा.

***

# २. स्वातंत्र्य आणि हक्क

लोकशाहीमध्ये नागरिकांना काही हक्क आणि कर्तव्ये असतात. जेव्हा या हक्कांचे आणि कर्तव्यांचे रक्षण केले जाते तेव्हा लोकांना स्वातंत्र्य मिळते, असे मानले जाते. हक्क म्हणजे लोकांना शासनामार्फत मिळालेले विशेषाधिकार होय. स्वातंत्र्य हे लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

## स्वातंत्र्य

स्वातंत्र्य आणि हक्क या पाठात आपण बंधनांचा अभाव, निवडीचे स्वातंत्र्य, अनुकूल परिस्थितीची उपलब्धता आणि सुखप्राप्ती या संदर्भात स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेणार आहोत. तसेच स्वातंत्र्याचे नकारात्मक आणि सकारात्मक हे दोन पैलू आणि भारतीय संविधानानुसार स्वातंत्र्य आणि हक्क या संकल्पना समजून घेऊ.

स्वातंत्र्य या संकल्पनेचे मुक्तता किंवा स्वराज्य असेही अर्थ असू शकतात. स्वतंत्र असणे म्हणजे मुक्त असणे. गुलामगिरीतून मुक्तता, जुलमी राजवटीपासून सुटका, परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्तता म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्य हे व्यक्तीचे, समाजाचे व राष्ट्राचे असते. व्यक्ती विकासासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांनाही स्वातंत्र्य असे म्हटले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

परकीय सत्तेपासून समाज मुक्त असणे म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य होय. आपला सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी व्यक्तीला आवश्यक असलेले स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य होय. हा राष्ट्रीय स्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्यातील फरक आहे.

**स्वातंत्र्याचे स्वरूप :** 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचे स्वरूप समजून घेताना पुढील विचारवंतांची मते अभ्यासावी लागतील.

**थॉमस हॉब्ज :** यांच्या मते 'स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक अधिकार आहे'. एखादी कृती करण्यासाठी व्यक्तीवर कोणतेही बंधन नसणे म्हणजे स्वातंत्र्य होय. ते म्हणतात की मनुष्याला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भीती आणि गरज या गोष्टी प्रेरणा देतात. त्यांनी बंधनांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य असा अर्थ सांगितला आहे.




थॉमस हॉब्ज (१५८८-१६७९)
एक ब्रिटिश तत्वज्ञ

**जॉन लॉक :** लॉक यांच्या मते, स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक अधिकार आहे. त्यांनी नैतिकतेच्या आधारे स्वातंत्र्याची संकल्पना मांडली. नैतिकदृष्ट्या व्यक्तीने इतरांच्या जीवित व स्वातंत्र्याच्या हक्कास हानी पोहचवू नये. प्रत्येकाने समतेच्या तत्वाचे उल्लंघन न करता स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा. स्वातंत्र्य हे मनुष्य जीवनाचे अभिन्न अंग आहे. लॉक यांनी स्वातंत्र्याला जास्त महत्त्व दिले. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती विवेकी आहे. म्हणून त्यांनी सदसद्‌विवेकबुद्धीने स्वातंत्र्य उपभोगण्याचे समर्थन केले. मात्र त्यांना अमर्याद स्वातंत्र्याची संकल्पना मान्य नव्हती. त्यांच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेत बंधनांचा अभाव आणि निवडीचे स्वातंत्र्य या दोन तत्त्वांचा समावेश आहे.



जॉन लॉक (१६३२-१७०४)
एक ब्रिटिश तत्वज्ञ

***जाँ जॅकवेस रुसो :*** रुसो यांनी स्वातंत्र्याचा सामूहिक दृष्टिकोनातून विचार केला आहे. त्यांच्या मते, व्यक्तीने संपूर्ण समाजाच्या हितासाठी स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवला पाहिजे. त्यांची स्वातंत्र्याची संकल्पना समाजातील व्यक्तीला वर्गव्यवस्था आणि विषमतेपासून स्वातंत्र्य देणारी आहे. त्यांच्या मते, विषमता हा स्वातंत्र्यप्राप्तीतील अडथळा आहे. तसेच, नागरी आणि राजकीय समाजाच्या उदयामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यातून व्यक्तीला मुक्तता मिळणे म्हणजे स्वातंत्र्य होय. हे अडथळे पुढील दोन प्रकारांत मांडले आहेत. (i) व्यक्तीला सार्वजनिक हिताचा विचार करण्यास रोखणारे अडथळे. (ii) समाजातील विषमतेमुळे निर्माण होणारे अडथळे.




जाँ जॅकवेस रुसो
(१७१२-१७७८)
एक जिनीव्हन तत्त्वज्ञ

**रुसो**

"मनुष्य हा जन्मतःच स्वतंत्र आहे. परंतु तो सर्वत्र शृंखलांमध्ये बंदिस्त आहे." असे रुसो यांचे मत आहे. रुसो यांचा जन्म जिनीव्हामध्ये झाला. त्यांना फ्रेंच राज्यक्रांतीचा जनक मानतात.

रुसो यांनी हॉब्ज आणि लॉकप्रमाणे स्वातंत्र्याला नैसर्गिक अधिकार मानले नाही. समाज एकत्रित येऊन नागरिकांच्या जीविताचे व हिताचे संरक्षण करतो. म्हणून रुसो यांनी सामाजिक विषमतेपासून मुक्ततेच्या स्वातंत्र्यावर भर दिला. त्यांच्या मते स्वातंत्र्याच्या संकल्पनेत पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य आणि अनुकूल परिस्थितीची उपलब्धता महत्त्वाची आहे.


***जेरेमी बेंथॅम :*** जेरेमी बेंथॅम यांनी सुखप्राप्तीच्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्याचा अर्थ स्पष्ट केला. त्यांनी स्वातंत्र्य आणि सुख यांचा परस्परांशी संबंध जोडला. सुख प्राप्त होण्यासाठी आणि दुःख टाळण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे, असा विचार त्यांनी मांडला.



जेरेमी बेंथॅम (१७४८ -१८३२)
एक ब्रिटिश तत्त्वज्ञ

जेरिमी बेंथॅमच्या विचारात 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' हा मूलमंत्र होता. यास नकारात्मक स्वातंत्र्य असे म्हटले जाते.

***जॉन स्टूअर्ट मिल :*** मिल यांनी स्वातंत्र्याच्या संकल्पनेत व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे समर्थन केले आणि राज्याच्या अमर्यादित अंकुशाचा विरोध केला. त्यांनी दिलेली स्वातंत्र्याची संकल्पना म्हणजे 'स्वतःवर (व्यक्तिशः), स्वतःच्या शरीरावर आणि बुद्धीवर (मन) व्यक्तीचा पूर्ण अधिकार आहे.' मिलचे स्वातंत्र्यावरचे मुद्दे आजही समर्पक आहेत. त्यांचा स्वातंत्र्यविषयक विचार 'ऑन लिबर्टी' (On Liberty) या ग्रंथात पाहायला मिळतो.



जॉन स्टूअर्ट मिल
(१८०६-१८७३)
एक ब्रिटिश तत्त्वज्ञ

## स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना

इसाया बर्लिन यांनी १९५८ मध्ये प्रकाशित केलेल्या 'स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना' (Two Concepts of Liberty) या निबंधामध्ये नकारात्मक व सकारात्मक स्वातंत्र्य



इसाया बर्लिन (१९०९-१९९७)
रशियन-ब्रिटिश तत्त्वज्ञ आणि इतिहासतज्ज्ञ

या दोन संकल्पना मांडल्या आहेत. सकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना आधुनिक उदारमतवादी विचारप्रणालींमधून घडलेली आहे, तर नकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना अभिजात उदारमतवाद आणि नवउदारमतवाद या दोन विचारप्रणालींच्या प्रभावातून घडलेली आहे. इसाया बर्लिन यांच्या मते, स्वातंत्र्य बंधनविरहित असते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**काही संकल्पनांचे थोडक्यात वर्णन :**

- उदारमतवाद ही एक राजकीय विचारधारा आहे. व्यक्तिवाद हा या विचारधारेच्या गाभ्याशी आहे. व्यक्तिवाद, विवेकवाद, स्वातंत्र्य, न्याय आणि सहिष्णुता ही उदारमतवादाची मूलभूत मूल्ये आहेत.
- अभिजात उदारमतवाद हा 'किमान शासन' या कल्पनेवर आधारलेला आहे. यात सरकारी हस्तक्षेप हा कायदा आणि सुव्यवस्था तसेच वैयक्तिक सुरक्षितता यांपुरता मर्यादित असतो.
- आधुनिक उदारमतवाद म्हणजे राज्याला व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप करण्यास दिलेली मान्यता होय. राज्यसंस्था कल्याणकारी धोरणांद्वारे सामाजिक विषमता दूर करून आणि त्याद्वारे व्यक्तीचे स्वातंत्र्य राखण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी योगदान देऊ शकते.
- नवउदारमतवाद मुक्त बाजारपेठ व मुक्त व्यापाराचा पुरस्कर्ता आहे. खासगीकरण, कल्याणकारी योजनांवरच्या खर्चात कपात, खासगी कार्पोरेट कंपन्यांना करात विशेष सवलत इत्यादींना नवउदारमतवादी धोरणात महत्त्वाचे स्थान असते.

**नकारात्मक स्वातंत्र्य :** नकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना अभिजात उदारमतवाद आणि नवउदारमतवाद या दोन विचारप्रणालींमधून उदयास आली आहे. जे.एस.मिल, इसाया बर्लिन, फ्रेडरिक हायेक, रॉबर्ट नॉझिक या विचारवंतांच्या लेखनामध्ये नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. नकारात्मक स्वातंत्र्य स्वातंत्र्यावरील सर्व बंधनांना नाकारते. राज्यसंस्थेने व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप करण्यास नकारात्मक स्वातंत्र्य विरोध करते. राज्यसंस्था सामाजिक, आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करत नाही हे नकारात्मक स्वातंत्र्याचे वैशिष्ट्य ठरते. व्यक्तिस्वातंत्र्य बंधनांमुळे धोक्यात येते. यासाठीच धाक, दहशत, जबरदस्ती, राज्यसंस्थेचा हस्तक्षेप यांना ही संकल्पना विरोध करते.

विचाराचे स्वातंत्र्य हे नकारात्मक स्वातंत्र्याचा आधार आहे. जेरेमी बेंथॅम यांनी नकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. व्यक्तीला आपले हित चांगले समजते. त्यामुळे राज्याने त्यामध्ये अडथळे आणू नयेत, असे तत्त्व बेंथॅम यांनी मांडले. 'मॅन्युअल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या ग्रंथात त्यांनी मुक्त आर्थिक व्यवहार हे तत्त्व मांडले. त्याचप्रमाणे जे.एस.मिल यांनी 'ऑन लिबर्टी' या ग्रंथात नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. मिलने सामाजिक, राजकीय व्यवस्थेच्या हस्तक्षेपापासून स्वातंत्र्याच्या संरक्षणाचा पुरस्कार केला. याशिवाय मिल यांनी विचारस्वातंत्र्य व कृतिस्वातंत्र्य यांतील आंतरसंबंध स्पष्ट केले. व्यक्तीच्या विकासासाठी मिलने व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार नकारात्मक स्वातंत्र्य म्हणून केला, परंतु त्यांनी स्वातंत्र्याच्या परिणामाचे मोजमाप केले. त्यांच्या मते कोणत्याही कृतीचा व्यक्तीपेक्षा समाजावर गुणात्मक परिणाम अधिक होतो. अशा परिस्थितीत मिलने नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना नाकारली. म्हणून मिलची नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना इसाया बर्लिनपेक्षा वेगळी आहे.

इसाया बर्लिन यांच्या मते कृती करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य होय. या तत्त्वानुसार कृती दुय्यम ठरते आणि कृती करण्याची संधी जास्त महत्त्वाची ठरते. या तत्त्वानुसार कृतीचा परिणाम महत्त्वाचा ठरत नाही; त्यामुळे त्याचे मोजमापही केले जात नाही. यामुळे ही संकल्पना गुणवत्तेला महत्त्व देत नाही. उदा., ही संकल्पना


स्वत:च्या आवडीनुसार शिक्षण घेणे, नोकरी करणे, उपासमार सहन करणे या तीन गोष्टींमध्ये गुणात्मक फरक करत नाही. थोडक्यात, त्यांच्या मते कृतीच्या परिणामापेक्षा कृतीची संधी मिळणे जास्त महत्त्वाचे आहे.


इसाया बर्लिन यांनी नकारात्मक स्वातंत्र्याची पुढील वैशिष्ट्ये नोंदवली आहेत.

(i) व्यक्तीला पर्याय निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. पर्याय निवडीवर बंधन असू नये. अशा अडथळ्यांस विरोध हे नकारात्मक स्वातंत्र्याचे वैशिष्ट्य आहे.

(ii) नकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना नवउदारमतवादी विचारांवर आधारित आहे.

फ्रेडरिक हायेक, रॉबर्ट नॉझिक यांनी नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट केली आहे. फ्रेडरिक हायेक हे नवउदारमतवादी विचारवंत होते. ते व्यक्तिवादी विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही स्वरूपाचा अडथळा नसल्याची स्थिती असे वर्णन केले आहे. आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला. त्याचबरोबर व्यक्तिजीवनातील राज्याचा हस्तक्षेप अमान्य केला. त्यांच्या मते, आर्थिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. खऱ्या स्वातंत्र्यावर नियंत्रण किंवा बंधन नसावे.


फ्रेडरिक हायेक (१८९९-१९९२)
अँग्लो-ऑस्ट्रियन तत्त्वज्ञ


रॉबर्ट नॉझिक (१९३८-२००२)
अमेरिकन तत्त्वज्ञ

रॉबर्ट नॉझिक हे नवउदारमतवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मते व्यक्तीला मान्य नसलेली बंधने त्याच्यावर लादली गेली की व्यक्तीचे स्वातंत्र्य अडचणीत येते. यामुळे स्वातंत्र्य बंधनांपासून सुरक्षित ठेवले पाहिजे. राज्य, समाज आणि आर्थिक बंधनापासून व्यक्ती स्वतंत्र असावी, अशी त्यांची भूमिका होती.

**इसाया बर्लिन यांचे नकारात्मक स्वातंत्र्याविषयीचे विधान :** 'मी कोणत्याही व्यक्तीचा गुलाम नाही.' **इसाया बर्लिन यांचे सकारात्मक स्वातंत्र्याविषयीचे विधान :** 'मीच माझा मालक आहे'.

**सकारात्मक स्वातंत्र्य :** सकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार मुख्यत्वेकरून रुसो आणि हर्बट मार्क्युझ यांनी केला. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना आधुनिक उदारमतवादातून उदयाला आली आहे. नकारात्मक स्वातंत्र्य संकल्पनेतून स्वातंत्र्याची संकल्पना परिपूर्ण होत नाही. आधुनिक उदारमतवाद्यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव आणि सामूहिक हित या संकल्पनांमध्ये सहसंबंध असल्याचा विचार मांडला. ते असेही म्हणतात, की स्वातंत्र्याचा परिणाम समता आणि न्यायावर होतो.

सकारात्मक स्वातंत्र्यानुसार कायदा व्यक्तीला मार्गदर्शन करतो. कायद्याच्या मदतीने व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. रुसो यांनी सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे कारण त्यांच्या मते, नैतिक कायद्याच्या पालनातून व्यक्तीला अधिक स्वातंत्र्य मिळू शकते. त्यांनी समाजाच्या विवेकपूर्ण 'सामूहिक इच्छांचा'ही स्वीकार केला. राज्य ही एक सार्वभौम सत्ता आहे जी 'सामूहिक ईहा' या संकल्पनेचे प्रतिनिधित्व करते, म्हणूनच ते व्यक्तीवरील राज्याचे नियंत्रण मान्य करतात. म्हणून राज्याने व्यक्तीवर बंधने घालावीत या विचारांचे रुसो समर्थन करतात.

हर्बट मार्क्युझ हे नवमार्क्सवादी विचारवंत होते. त्यांनी सकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या मते कामगार वर्गाला त्यांचे ध्येय आणि

गरजांची जाणीव नसते. म्हणूनच त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारी श्रेष्ठीजनांकडून मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. 'One Dimensional Man' व 'Eros and Civilisation' या पुस्तकांतून मार्क्युझ यांनी सकारात्मक स्वातंत्र्याबद्‌दलची त्यांची मते मांडली.



हर्बट मार्क्युझ
(१८९८-१९७९)
जर्मन-अमेरिकन तत्त्वज्ञ

ते म्हणतात, की विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे लोकांचे राहणीमान तर सुधारले परंतु विषमता कमी झाली नाही. यामुळे समाजाच्या सांस्कृतिक विकासात अडथळा आला. मार्क्युझ यांच्या मते, अमेरिकन समाजातील व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वत्व हरवले आहे. सकारात्मक स्वातंत्र्याबद्‌दल युक्तिवाद करताना ते असे म्हणतात, की मनुष्य सोन्याच्या पिंजऱ्यातील पक्ष्याप्रमाणे आहे जो मोकळ्या आकाशात झेप घेण्याची क्षमता हरवून बसला आहे. त्याला निखळ स्वातंत्र्याचा अनुभव नसल्यामुळे तो क्रांतीचा विचार देखील करू शकत नाही. सामूहिक जीवनात सामूहिक नियंत्रण आवश्यक असते, हे सकारात्मक स्वातंत्र्याचे तत्त्व आहे असे त्यांनी मांडले आणि म्हणूनच त्यांनी राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाला मान्यता दिली. उदाहरणार्थ, प्रदूषणमुक्त वातावरण कायम राखण्यासाठी सर्वांनी मिळून सामूहिक हितासाठी प्रयत्न करावा. त्यासाठी बळाचा वापर करावा लागला तरी तो समूहाच्या हितासाठी उचित असतो.

### स्वातंत्र्याबाबतची भारतीय संकल्पना

भारतात स्वातंत्र्याच्या संकल्पनेला मुक्ती ही संकल्पना वापरली जाते. परंपरागत अर्थाने मोक्ष किंवा पुनर्जन्माच्या चक्रातून सुटका म्हणजे मुक्ती असा आध्यात्मिक अर्थ आहे, म्हणून मुक्ती ही आध्यात्मिक संकल्पना आहे; मात्र आधुनिक काळात, सामाजिक बंधनातून मुक्ती असा स्वातंत्र्याचा अर्थ घेतला जातो.

ब्रिटिशकालीन भारतात स्वातंत्र्याची संकल्पना तीन पद्धतींनी आकाराला आली.

(i) ब्रिटिशांनी व्यक्तीचे अधिकार व स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यासाठी काही कायदे केले. उदाहरणार्थ, सती बंदीचा कायदा. तसेच त्यांनी पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार व प्रचार केल्यामुळे स्वातंत्र्याचा पाश्चिमात्य विचार भारतात आला. परिणामतः, भारतीय स्वातंत्र्याची चळवळ आणि समाज सुधारणा या विचारांनी प्रभावित झाली.

(ii) महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाच्या संदर्भाने स्वातंत्र्याच्या अर्थाचे विविध पैलू सांगितले. पहिला अर्थ म्हणजे, जातीय विषमतेतून मुक्ती म्हणजेच स्वातंत्र्य होय. याचबरोबर, सामाजिक बंधनापासूनचे स्वातंत्र्य हा पैलू देखील त्यांनी महत्त्वाचा मानला. याशिवाय काही व्यक्तींना समाज जीवनात दुय्यमत्वाला सामोरे जावे लागत होते, या दुय्यमत्वाचा अंत हाही स्वातंत्र्याचा पैलू होय असेही त्यांनी मांडले. उदाहरणार्थ, अपमान आणि अवहेलनेचा अंत, स्त्री-पुरुष विषमतेचा अंत आणि उच्च-नीचतेचा अंत, जातीय वर्चस्वापासून निम्न जातींची मुक्ती असा स्वातंत्र्याचा अर्थ त्यांनी सांगितला.




महात्मा जोतीराव फुले
(१८२७-१८९०)
भारतीय समाजसुधारक
आणि विचारवंत



डॉ.बाबासाहेब आंबेडकर
(१८९१-१९५६)
भारतीय न्यायशास्त्रज्ञ,
अर्थशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक

(iii) महात्मा गांधींनी स्वातंत्र्यासाठी 'स्वराज' ही संकल्पना स्वीकारली. ही संकल्पना त्यांनी

'हिंद स्वराज' या पुस्तकातून मांडली. स्वराज या संकल्पनेत 'स्व' आणि 'राज' अशा दोन संकल्पनांचा समावेश केला आहे. स्वतःवर राज्य म्हणजे स्वराज. त्यांची 'स्वराज' ही संकल्पना व्यापक होती. त्यांना केवळ ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते, तर पाश्चिमात्य सांस्कृतिक वर्चस्वापासून मुक्ती असाही स्वातंत्र्याचा अर्थ अपेक्षित होता. स्वराज म्हणजे मानवी मूल्ये पायदळी तुडवणाऱ्यांपासून स्वप्रतिष्ठा परत मिळवणे होय. या संकल्पनेत स्वयंशासन, स्वयंशिस्त, मानवी मूल्य या गोष्टींना अधिक महत्व होते.



महात्मा गांधी
(१८६९-१९४८)
भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे नेते

### हक्क

मनुष्याला जगण्यासाठी काही हक्कांची आवश्यकता असते. तसेच, उच्चतम व्यक्तिमत्व विकासासाठी काही विशिष्ट हक्क आवश्यक असतात. हॅरॉल्ड लास्की यांच्या मते, 'हक्क म्हणजे, सामाजिक जीवनातील अशी परिस्थिती, की ज्याच्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वतःचे जीवन उत्तम प्रकारे जगू शकणार नाही.'

हक्कांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

(i) **नैसर्गिक हक्क :** नैसर्गिक हक्क हे मानवी स्वभावाचे आणि विवेकाचे अभिन्न अंग आहे. त्यांचे स्वरूप सार्वत्रिक आहे. जीविताचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क ही नैसर्गिक हक्कांची उदाहरणे आहेत.

(ii) **नैतिक हक्क :** नैतिक हक्क व्यक्ती आणि समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीवर आधारलेले असतात. उदाहरणार्थ, शिक्षक आणि वडीलधाऱ्या व्यक्तींना आदर मिळणे हा त्यांचा नैतिक हक्क आहे.

(iii) **वैधानिक हक्क :** वैधानिक हक्क राज्याकडून लोकांना दिले जातात. साधारणतः त्या हक्कांचे कायद्याच्या भाषेत संहितीकरण केलेले असते. या हक्कांचे स्वरूप सार्वत्रिक नसते. वेगवेगळ्या देशांतील वेगवेगळे शासन त्यांच्या जनतेला कोणते हक्क द्यायचे ते ठरवतात. वैधानिक हक्कांची अंमलबजावणी कायद्याद्वारे केली जाते.

वैधानिक हक्कांचे दोन प्रकार आहेत, ते खालीलप्रमाणे-

(अ) *नागरी हक्क* : नागरी हक्क व्यक्ती आणि व्यक्तींची मालमत्ता यांच्याशी संबंधित असतात. नागरी हक्कांमध्ये जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क आणि मालमत्तेचा हक्क यांचा समावेश होतो. राज्यांकडून नागरी हक्कांचे संरक्षण केले जाते.

(ब) *राजकीय हक्क* : राजकीय हक्क व्यक्तींना राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची संधी देतात. मतदानाचा हक्क, निवडणूक लढवण्याचा हक्क, सार्वजनिक पदग्रहण करण्याचा हक्क, शासनावर टीका आणि विरोध करण्याचा हक्क इत्यादींचा समावेश राजकीय हक्कांमध्ये होतो. सामान्यतः लोकशाही राज्यांत नागरिकांना राजकीय हक्क मिळतात.

**अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याचा सरनामा :** आम्ही हे स्वयंसिद्ध सत्य उचलून धरतो, की सर्व व्यक्ती जन्मतः समान आहेत. निर्मात्याने त्यांना हिरावून घेता न येणारे हक्क दिले आहेत. ज्यामध्ये जीविताचा हक्क, स्वातंत्र्य आणि सुखप्राप्तीचे हक्क यांचा समावेश होतो.

### मानवी हक्क

प्रत्येक व्यक्तीला मानव म्हणून काही मूलभूत हक्क मिळतात, यांना मानवी हक्क म्हणतात. हे हक्क आपल्याला जन्मतःच मिळतात. ते

आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. ते आपल्याला कोणा समाजाने अथवा राज्यकर्त्याने दिलेले नसतात, म्हणजेच मानवी हक्क आपल्यापासून विलग करता येत नाहीत. मानवी हक्क हे नैसर्गिक असतात. ते न्यायावर आधारित असतात. मानवी हक्क सार्वत्रिक आहेत आणि सामाजिक भेदभाव न करता सर्व मानवांना हे हक्क दिले जातात. माणसातील मानवी गुणांचा, बुद्‌धिमत्तेचा व कौशल्यांचा विकास होण्यासाठी या हक्कांची गरज असते. तसेच माणसाची व मानवी आयुष्याची प्रतिष्ठा आणि मूल्य यांचे संवर्धन होण्यासाठी हे हक्क असणे आवश्यक मानले आहेत.

मानवी हक्कांमध्ये जीविताचा, उपजीविकेचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांबरोबरच संघटना स्थापनेचे स्वातंत्र्य यांचाही समावेश होतो. हे हक्क काळानुसार विकसित होणारे आहेत म्हणूनच आज आपण केवळ नागरी आणि राजकीय हक्कांचा विचार करत नाही तर माहितीचा अधिकार आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार यांसारख्या हक्कांची चर्चा करतो.

१० डिसेंबर १९४८ रोजी, संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा घोषित केला. या जाहिरनाम्यात नैसर्गिक आणि नागरी हक्कांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय मानवाला आवश्यक असलेले स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव यांचा समावेश केला आहे.

**करून पहा.**

मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरनाम्यात समाविष्ट असलेल्या हक्कांची यादी करा.

मानवी हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल असणे गरजेचे असते. मानवी हक्कांची अंमलबजावणी करणे अवघड असते. म्हणून जगात अनेक देशांमध्ये मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसते. अमेरिकेत अजूनही कृष्णवर्णीय लोक समान दर्जा मिळवण्यासाठी लढत आहेत. भारतात अजूनही जातीच्या आधारावर भेदभाव केला जात असल्याचे दिसून येते. अनेक देशांत स्त्रिया आणि बालकांची स्थिती दयनीय आहे. त्यांना त्यांचे हक्क मानवी हक्क जाहिरनाम्याप्रमाणे मिळत नाहीत.

**करून पहा.**

मानवी हक्क उल्लंघनांच्या उदाहरणांची चर्चा करून उदाहरणे नोंदवा.

## भारतीय संविधानातील हक्क आणि स्वातंत्र्याची संकल्पना

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात मूलभूत अधिकार स्पष्ट केले आहेत. हे मूलभूत अधिकार खालीलप्रमाणे –

- समानतेचा हक्क
- स्वातंत्र्याचा हक्क
- शोषणाविरुद्‌धचा हक्क
- धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क
- सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क
- घटनात्मक उपाययोजना करण्याचा हक्क



**माहीत आहे का तुम्हांला ?**

शिक्षणाच्या अधिकाराचा समावेश मूलभूत हक्कांच्या यादीत २००२ साली झालेल्या ८६ व्या घटना दुरुस्तीने करण्यात आला. प्रत्यक्षात या कायद्याची एप्रिल २०१० पासून अंमलबजावणी सुरू झाली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारताच्या मूळ संविधानात संपत्तीच्या हक्काचा समावेश होता. १९७८ साली झालेल्या ४४व्या घटना दुरुस्तीने संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कांमधून वगळण्यात आला आहे. आता कलम ३०० (क) नुसार त्याला वैधानिक हक्काचा दर्जा देण्यात आला आहे.

भारतीय संविधानात सकारात्मक आणि नकारात्मक या दोन्हीही स्वातंत्र्यांचा समन्वय साधला गेला आहे. संविधानाच्या १९व्या कलमात विविध स्वातंत्र्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. याचबरोबर २१व्या कलमात स्वातंत्र्यावरील मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या आहेत. २१व्या कलमानुसार कायद्याने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीखेरीज कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही असे स्पष्ट केले आहे. या कलमाने व्यक्तिस्वातंत्र्याला मानवी हक्कांचा दर्जा प्राप्त करून दिला आहे, कारण या कलमानुसार ते स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी कोणताही अपवाद किंवा पात्रता सांगण्यात आलेली नाही. त्यामुळे या कलमानुसार भारतीयांसोबतच परकीय नागरिकांनासुद्धा जीविताचे स्वातंत्र्य मिळू शकते.

भारतीय न्यायमंडळाने विविध खटल्यांचे निर्णय देताना हक्क आणि स्वातंत्र्य या संकल्पनेचा अन्वयार्थ लावला आहे. स्वातंत्र्य प्रत्यक्ष व्यवहारात उतरवताना न्यायव्यवस्थेने लावलेला अन्वयार्थ जास्त महत्त्वाचा ठरतो. उदाहरणार्थ :

- १९६३ साली 'खडकसिंग विरुद्‌ध उत्तरप्रदेश सरकार' खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले, की व्यक्तीला भारतभर संचार स्वातंत्र्य राहील.
- १९८१ साली 'फ्रान्सिस कोरॉली मुलिन विरुद्‌ध दिल्ली केंद्रशासित प्रदेश' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्वातंत्र्याचा अधिक व्यापक अर्थ स्पष्ट केला आहे. जीविताच्या अधिकाराचा अर्थ त्यांनी मानवी प्रतिष्ठेच्या अधिकाराशी जोडला. पोषक आहार, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संचार स्वातंत्र्य इत्यादींचा जीवनाच्या मूलभूत अधिकारांत समावेश करण्यात आला.
- १९८४ साली 'बंधुवा मुक्ती मोर्चा विरुद्‌ध भारत सरकार' खटल्याच्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भात २१व्या कलमाचा अर्थ स्पष्ट केला. न्यायालयाने प्रतिष्ठेने जगण्याच्या अधिकारात श्रमिकांच्या आरोग्याची देखभाल, बालकांची शारीरिक छळापासून मुक्ती, विकासाची संधी व सुविधा, उत्तम शैक्षणिक सुविधा, मातृत्वाची देखभाल आणि कामासाठी पोषक वातावरण निर्मिती या सर्वांचा समावेश स्वातंत्र्याच्या संकल्पनेत केला.
- १९८९ मध्ये 'रामशरण विरुद्‌ध भारत सरकार' या खटल्याचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने परत एकदा २१व्या कलमाची व्याप्ती वाढवली. मनुष्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या परंपरा, संस्कृती, वारसा आणि त्यांचे पूर्ण संरक्षण या गोष्टी त्यांनी स्वातंत्र्याच्या कक्षेत समाविष्ट केल्या.
- २०१७ साली, 'पुट्टास्वामी विरुद्‌ध भारत सरकार' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने खासगीपणाचा हक्क (Right to Privacy) हा व्यक्तीचा मूलभूत हक्क असल्याचे नमूद केले.
- यानंतरच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त पाणी आणि हवा मिळण्याच्या अधिकाराला स्वातंत्र्याच्या संकल्पनेत समाविष्ट करावे असे स्पष्ट केले.

**चर्चा करा.**

आपण भारताच्या संदर्भात जेव्हा मानवी हक्कांचा विचार करतो तेव्हा खालीलपैकी कोणत्या हक्कांना आपण जास्त महत्त्व देऊ? राजकीय आणि नागरी हक्क किंवा अन्न, निवारा, वस्त्र, आरोग्य आणि शिक्षण हे हक्क.

**चर्चा करा.**

खालील वाक्ये वाचा.

- मी माझ्या घराची रोज स्वच्छता करून कचरा रस्त्यावर टाकतो.
- मी परदेशी प्रवाशांचे त्यांना परवानगी विचारल्याशिवाय फोटो काढतो.
- काही प्रेक्षक चित्रपटगृहात धुम्रपान करतात.

वरील प्रत्येक वाक्यावर स्वातंत्र्याच्या हक्काच्या संदर्भात चर्चा करा.

**करून पहा :** भारतीयांचे हक्क आणि स्वातंत्र्य यांवर सर्वोच्च न्यायालयात झालेले वेगवेगळे खटले शोधा. त्यावर वर्गात चर्चा करा.

या प्रकरणात आपण स्वातंत्र्य आणि हक्क यांचा अर्थ बघितला तसेच भारताच्या संदर्भात त्यांचा अर्थ समजून घेतला. पुढच्या प्रकरणात आपण समता आणि न्याय या दोन संकल्पना अभ्यासणार आहोत.



## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. 'ऑन लिबर्टी' हा ग्रंथ ......... यांनी लिहिला.
(रॉबर्ट नॉझिक, थॉमस हॉब्ज, जे.एस.मिल, इसाया बर्लिन)

२. 'स्वराज' ही संकल्पना .......... यांनी मांडली आहे.
(महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर, डॉ.राजेंद्र प्रसाद)

**(ब) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

राज्याने स्वातंत्र्यामध्ये अडथळे आणू नयेत असे तत्व जेरेमी बेंथॅम यांनी मांडले. कारण–

(अ) राज्य आपल्याला स्वातंत्र्य देत नाही.

(ब) व्यक्तीला आपले हित चांगले समजते.


(क) स्वातंत्र्य ही अडथळा नसल्याची स्थिती असते.

**(क) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. ८६ व्या घटना दुरुस्तीमार्फत भारताच्या संविधानात समाविष्ट करण्यात आलेला मूलभूत हक्क–

२. व्यक्ती आणि समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीवर आधारलेले हक्क–

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधान चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

वैधानिक हक्क हे सार्वत्रिक नसतात.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. थॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक यांची स्वातंत्र्याची संकल्पना

२. मानवी हक्क आणि वैधानिक हक्क.

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. महात्मा गांधींचा स्वातंत्र्याचा विचार स्पष्ट करा.

२. मानवी हक्क या संकल्पनेची चर्चा करा.

३. इसाया बर्लिन यांचा स्वातंत्र्याचा विचार विशद करा.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

हक्कांची संकल्पना विशद करा.

(अ) हक्कांचा अर्थ आणि वर्गीकरण (ब) वैधानिक हक्क (क) मानवी हक्क

**उपक्रम**

भारतातील नागरी हक्कांची यादी करा.

# ३. समता व न्याय

या प्रकरणात आपण समता आणि न्याय या दोन संकल्पना समजून घेणार आहोत. कायद्यासमोर समानता, राजकीय समता, समान संधीचे तत्त्व हे समतेचे विविध अर्थ समजून घेणार आहोत. तसेच या प्रकरणात समतेचे प्रकार स्पष्ट केले आहेत. याशिवाय वैधानिक न्याय, नैसर्गिक न्याय व सामाजिक न्याय या न्यायाच्या संकल्पना देखील समजून घेणार आहोत.

## समता

मानवी समाजाचे समता हे महत्वाचे मूल्य आहे. समता म्हणजे सारखेपणा नव्हे, परंतु सगळी माणसं समान आहेत, असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा सर्व माणसांना समान वागणूक मिळावी असा अर्थ अभिप्रेत असतो. प्राचीन काळात ॲरिस्टॉटलच्या विचारात समतेच्या संकल्पनेचा विचार मर्यादित अर्थाने आला आहे, मात्र आधुनिक काळात समतेचा अर्थ अधिक व्यापकपणे घेतला जातो. सुख-दुःख कळण्याची क्षमता, सहिष्णुतेची वागणूक, आत्मसन्मानाची इच्छा अशा संदर्भात समतेचा विचार मांडला जातो. म्हणजेच समतेला नैतिक आणि सामूहिक अशा बाजू आहेत. याशिवाय आधुनिक काळात समतेचा विचार एक राजकीय ध्येय म्हणून देखील केला जाऊ लागला.

जगात असंख्य प्रकारच्या असमानता आहेत. काही असमानता नैसर्गिक तर काही मानवनिर्मित आहेत. नैसर्गिक असमानता म्हणजे वर्ण, उंची, बुद्धिमत्ता, शारीरिक बळ, आनुवंशिकता इत्यादींमधील फरक होय. मानवनिर्मित असमानता जात, पैसा, धर्म इत्यादींच्या आधारावर निर्माण केलेल्या असतात. प्रत्येकाची योग्यता, क्षमता आणि दृष्टिकोन वेगळा असतो हे सर्वश्रुत आहे, मात्र त्यांना त्यांच्या कौशल्य आणि बुद्धिमत्तेनुसार विकासाची समान संधी दिली पाहिजे. समाजातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्थांमध्ये समता असणे आवश्यक आहे. न्याय, स्वातंत्र्य या संकल्पना समतेच्या कसोटीवर मांडल्या जातात. म्हणून समतेची संकल्पना बुद्धिप्रामाण्यवादी आहे.

**समतेचा इतिहास :** राजकीय तत्वज्ञानाच्या इतिहासात समता ही संकल्पना ग्रीकांच्या काळापासून अभ्यासली जाते. जुलूम, अनियंत्रित राजेशाही, असमान सामाजिक परिस्थिती अशा त्या वेळच्या संघर्षातून समतेच्या संकल्पनेचा विकास झाला. ॲरिस्टॉटल, हॉब्ज, रूसो, कार्ल मार्क्स, टॉकव्हिल या विचारवंतांनी समता या संकल्पनेचा विकास केला.

ॲरिस्टॉटल यांनी प्राचीन ग्रीक नगरराज्य पद्धतीमध्ये समतेची संकल्पना मांडली होती. ॲरिस्टॉटल यांची समतेची संकल्पना नगरराज्यांमधील नागरिकांपुरती मर्यादित होती. त्यांच्या समतेच्या संकल्पनेचा विकास शासक आणि शासित यांच्या संदर्भात झाला. त्यांनी बौद्धिक आणि प्रशासकीय क्षमतांमधील विषमता गृहीत धरून शासक आणि शासित हे नैसर्गिकरीत्या असमान आहेत असे प्रतिपादन केले. नागरिक या संकल्पनेतून अथेन्समधील परकीय, गुलाम आणि स्त्रिया यांना वगळले होते. त्यांनी राज्यघटनेमार्फत सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विशेष दर्जाच्या संकल्पनेचे निर्मूलन करून कायद्यापुढील समानता हा विचार मांडला. ॲरिस्टॉटल यांनी त्यांच्या 'द पॉलिटिक्स' या ग्रंथात न्याय आणि समता यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट केले.

थॉमस हॉब्ज यांनी 'लेव्हिएथन' या ग्रंथात नैसर्गिक समतेचा विचार मांडला. शारीरिक आणि बौद्धिक विषमता असली तरी हॉब्ज यांच्या मते, व्यक्तींमध्ये समानता असावी. प्रत्येक व्यक्तीस मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क असणे उचित आहे.

शासनसंस्थेला हे हक्क व्यक्तीकडून काढून घेता येत नाहीत. हा नैसर्गिक समतेचा विचार हॉब्ज यांनी मांडला.

रूसो यांनी कृत्रिम आणि नैसर्गिक विषमतांचे विश्लेषण केले. समूहजीवनामध्ये सुखाची कल्पना बळावली त्यामुळे मनुष्य इतरांवर वर्चस्व निर्माण करू लागला. मनुष्याच्या स्वार्थी प्रवृत्तीतून खासगी मालमत्तेची संकल्पना उदयाला आली. तसेच समाजात श्रमविभाजन सुरू झाले. खासगी मालमत्ता आणि श्रमविभाजन यांमुळे गरिबांचे शोषण सुरू झाले. या प्रक्रियेतून श्रीमंत वर्गाने कृत्रिम विषमता निर्माण केली. तसेच रूसो यांच्या मते शरीररचना आणि क्षमता यांमुळे व्यक्ती-व्यक्तींमध्ये विषमता निर्माण होते. रूसो यांनी नैसर्गिक कायद्यामार्फत समता निर्माण करण्याचा विचार मांडला.

कार्ल मार्क्स यांनी उदारमतवादी समतेची संकल्पना नाकारून समाजवादी समतेची संकल्पना मांडून वर्गविहिन समाज निर्माण करणे म्हणजे समता निर्माण करणे होय असा विचार मांडला. कामगारांची शोषणातून मुक्ती, उत्पादन साधनांचे समान वितरण या संकल्पनांना त्यांनी महत्त्व दिले. यामुळे प्रस्थापित होणारी समता उदारमतवादी समतेपेक्षा वेगळी असेल असा विचार कार्ल मार्क्स यांनी मांडला.

टॉकव्हिल यांनी अमेरिकन राज्यक्रांतीच्या अभ्यासावर आधारित समतेची संकल्पना मांडली. सरंजामशाही व्यवस्था जाऊन लोकशाही व्यवस्था येणे या प्रक्रियेत सामाजिक समतेची संकल्पना विकसित होते असा विचार त्यांनी मांडला. परावलंबीत्व आणि गुलामगिरीतून मुक्ती मिळवण्यासाठी टॉकव्हिल समतेचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते, लोकशाहीत लोक स्वातंत्र्यापेक्षा समतेला अधिक महत्त्व देतात; याचा अर्थ असा नव्हे की, स्वातंत्र्याची गळचेपी करून समतेचा पुरस्कार करणे योग्य आहे.

**समतेचे महत्त्व :** विषमता कमी करणे हे समतेचे मुख्य उद्दिष्ट असते. आपल्याला समतेची गरज पुढील कारणांसाठी आहे.

(i) न्याय्य स्थिती निर्माण होण्यासाठी समता आवश्यक आहे. समाजातील मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी संसाधनांचे न्याय्य वितरण हे तत्त्व स्वीकारण्याची गरज आहे.

(ii) जेव्हा समाज, सामाजिक आणि भौतिकदृष्ट्या विषम असतो तेव्हा व्यक्तीला आत्मसन्मान मिळत नाही म्हणून व्यक्तीच्या आत्मसन्मानासाठी समतेचे तत्त्व आवश्यक आहे.

(iii) समाजात परस्परांप्रति सन्मान राखण्यासाठी समतेची गरज असते. व्यक्तीला विकासाची समान संधी मिळण्यासाठी परस्परांचा आदर करणे महत्त्वाचे आहे.

(iv) सामाजिक समतेमुळे बंधुभाव निर्माण होतो. स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही संकल्पना बंधुभावामुळे प्रत्यक्ष अस्तित्वात येतात.

**समतेचे महत्त्वाचे पैलू :** समतेचे पैलू खालीलप्रमाणे आहेत.

**(i) कायद्यापुढील समता आणि कायद्याचे समान संरक्षण :** सर्व नागरिकांना कायदा समान मानतो व त्यामुळे तो सर्वांना एकाच प्रकारे लागू करण्यात येतो. श्रीमंत व गरीब किंवा समाजातील बलिष्ठ व कमकुवत गटांतील व्यक्तींना हे तत्त्व प्रत्यक्षात आणण्याची समान ताकद असते, असे मानता येणार नाही. न्यायालयात श्रीमंत-गरीब यांबद्दल समान वागणुकीचा एकच मापदंड असावा असा दावा केला जातो. न्यायदानाच्या प्रक्रियेत काळा-गोरा, गरीब-श्रीमंत असा भेदभाव होता कामा नये म्हणून कायद्यापुढे सर्वांना समानता असावी आणि कायद्याचे समान संरक्षण असावे असा दावा केला जातो.

**(ii) समान संधीचे तत्त्व :** सर्व नागरिकांना त्यांच्या अंगभूत गुणांचा विकास करण्यास व पात्रता संपादन करण्यास समान संधी असावी, परंतु

शैक्षणिक आणि सामाजिक कल्याणाची व्यवस्था असली तरच मागास गटातील व्यक्तींना प्रगत गटातील व्यक्तींशी खऱ्या अर्थाने समान पातळीवर स्पर्धा करता येते. म्हणून समान संधीचे तत्त्व हा समतेचा आधार मानला जातो.



**माहीत आहे का तुम्हांला?**

समता संकल्पना कशी असावी हा राजकीय तत्त्वज्ञानातील मध्यवर्ती विषय आहे. या संदर्भात समतेचे तीन मापदंड आहेत.

- कल्याणकारी समता : व्यक्तीला किती साधने मिळाली यापेक्षा व्यक्तीच्या गरजा पूर्ण होणे अभिप्रेत आहे.
- साधनांची समता : साधनांची समता म्हणजे साधनांचे समाजात न्याय्य पद्धतीने वितरण व्हावे.
- कार्यक्षमतांची समता : लोकांकडे किती साधने आहेत, यापेक्षा लोक त्या साधनांचा कसा उपयोग करतात हे येथे महत्त्वाचे आहे.

**करून पहा.**

अमर्त्य सेन यांनी समतेबाबत मांडलेला दृष्टिकोन वाचून चर्चा करा.

**समतेचे प्रकार :** समता या संकल्पनेचे पाच प्रकार आहेत.

(i) **नैसर्गिक समता :** नैसर्गिक समतेनुसार निसर्गतः सर्व माणसे समान आहेत. नैसर्गिक समतेच्या तत्त्वाचा अर्थ निसर्गाने सर्व माणसांना सारखीच क्षमता व गुणवत्ता बहाल केली आहे असा नव्हे, मात्र उपजत कमी-जास्त क्षमतांच्या आधारे भेदभाव केला जाऊ नये व सर्वांना अधिकाधिक आत्मविकासाची संधी समाजात उपलब्ध व्हावी हे अभिप्रेत आहे.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांना नैसर्गिक समतेची संकल्पना अमान्य होती, मात्र पाश्चिमात्य ख्रिश्चन विचारवंतांनी सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत असे मानले. आधुनिक काळात, हॉब्ज, लॉक, रूसो या विचारवंतांनी राज्यपूर्व (State of Nature) अवस्थेतील माणसांमधील नैसर्गिक समतेची संकल्पना मांडली.

(ii) **नागरी समता :** नागरी हक्क सर्व लोकांसाठी समान असावेत. सर्व लोक कायद्यापुढे समान आहेत. वंश, वर्ण, जात, धर्म, लिंग या आधारे लोकांमध्ये भेदभाव केला जाऊ नये. सर्वांना समान गुन्ह्यासाठी समान शिक्षा, सर्वांना कायद्याचे समान संरक्षण, विशिष्ट समाज घटकाला झुकते माप देणारा कायदा न करणे म्हणजे नागरी समता होय. यामध्ये स्त्रिया, मुले, मागास जाती-जमाती, दिव्यांग व्यक्ती यांना विशेष सवलती देणारा कायदा केला गेल्यास नागरी समतेच्या तत्त्वाला बाधा येत नाही; कारण या समाजघटकांची स्पर्धा शक्ती कमी असते.

(iii) **राजकीय समता :** प्रत्येक नागरिकाला शासनव्यवस्थेत सहभागी होण्याची समान संधी मिळणे म्हणजे राजकीय समता होय. केवळ लोकशाहीतच अशी राजकीय समता अनुभवता येते, मात्र राजकीय समता समाजात रुजवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. या समतेच्या अभावी समाजात असंतोष निर्माण होऊ शकतो. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार व प्रतिनिधित्वासंबंधीचे कायदे राजकीय समतेचे आधार आहेत.

(iv) **आर्थिक समता :** आर्थिक समता हा राजकीय समतेचा पाया असतो. आर्थिक विषमतेमुळे समाज दुभंगला जातो. आर्थिक समता म्हणजे स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना समान संधी असणे, लोकांचे आर्थिक शोषण न होणे, संपत्तीच्या केंद्रीकरणाला प्रतिबंध करणे आणि सर्वांना अत्यावश्यक वस्तू व सेवांची उपलब्धता असणे होय. हॅरॉल्ड लास्की यांच्या मते, जीवनाच्या किमान अत्यावश्यक वस्तूंबाबत

आर्थिक समता असावी. अर्नेस्ट बार्कर यांच्या मते, राज्यसंस्था सर्वांना मालमत्तेचा समान हक्क देते म्हणजेच तिने सर्वांच्या वाट्याला समान मालमत्ता उपलब्ध करून द्यावी असे नव्हे, तर सर्वांना त्यांच्या पात्रतेनुसार मालमत्ता जमवण्याचा समान हक्क असणे होय.

**चर्चा करा.**

वेठबिगारी पद्धत विरोधी कायदा, १९७६ या कायद्याविषयी तपशील गोळा करा व वर्गात त्याबाबत परिसंवाद आयोजित करा.

(v) **सामाजिक समता :** जात, धर्म, वर्ण, व्यवसाय, लिंग इत्यादी आधारांवर लोकांमध्ये भेदभाव न करणे म्हणजे सामाजिक समता होय. प्रत्येक समाजघटकाकडून समाजाच्या हितासाठी श्रमसेवा अपेक्षित असते. समाजात श्रमाची प्रतिष्ठा कमी-जास्त नसते हे आपण मान्य केले पाहिजे. असे असूनही आजही भारतात जाती, धर्म, वंश, लिंग इत्यादी आधारावर भेदभाव केलेला दिसून येतो. तसेच दक्षिण आफ्रिकेत आणि अमेरिकेत वांशिक भेदभाव दिसून येतो.

भारतात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेवर विशेष भर दिलेला दिसून येतो. दुर्बल, मागासलेल्या जातींतील समाज बांधवांची अस्मिता जागी करून त्यांना जीवनात प्रतिष्ठा मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

सर्व समाजघटकांना समान सामाजिक दर्जा, समान सामाजिक हक्क उपलब्ध करून देणे हे राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे. कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विषमता नियंत्रित केली जाते. उदाहरणार्थ, भारतात अस्पृश्यता निवारणासाठी कायदे करण्यात आले.

## भारताच्या संदर्भात समता

भारतासारख्या वैविध्यपूर्ण समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. जातिव्यवस्था सामाजिक समतेपुढील महत्त्वाचा अडथळा ठरली आहे. सामाजिक व आर्थिक समतेसाठी एकाच वेळी प्रयत्न करावे लागतात. त्याचप्रमाणे व्यक्तीचे स्वातंत्र्य प्रत्यक्षात साकारण्यासाठी समतेची स्थापना होणे आवश्यक असते.


भारतीय समाज हा वर्ण आणि जाती यांच्या उतरंडीमध्ये विभागलेला आहे. तसेच भारतात स्त्री-पुरुष असमानता आढळते. भारतातील पुरुषसत्ताक पद्धती ही स्त्री-पुरुषांमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता निर्माण करते. याबरोबर भारतात आर्थिक साधनसंपत्तीचे वितरण देखील विषम झालेले आहे. त्यामुळे भारतात महात्मा फुले, ताराबाई शिंदे, न्या.रानडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी साधनसंपत्तीचे समान आणि न्याय्य वितरण झाले पाहिजे असा आग्रह धरला.

### भारतीय विचारवंतांच्या मते समतेचे काही पैलू



**महात्मा जोतीराव फुले**
(१८२७-१८९०)
भारतीय समाजसुधारक आणि विचारवंत. जातीय भेदभाव आणि स्त्री-पुरुष भेदभाव दूर करण्यावर भर.

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे**
(१८४२-१९०१)
अभ्यासक व समाजसुधारक. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक सदस्य आणि समाजसुधारक. बालविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचे हक्क यासंबंधी कार्य.





**ताराबाई शिंदे**
(१८५०-१९१०)
स्त्रीवादी सुधारक.
जातिव्यवस्थेच्या बंधनातून मुक्तता.



**महात्मा गांधी**
(१८६९-१९४८) : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि स्त्री-पुरुष समानतेवर भर.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
(१८९१-१९५६)
भारतीय कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आणि समाजसुधारक.

सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विषमतांच्या निर्मूलनावर भर आणि जाती अंताचा विचार.



**डॉ. राममनोहर लोहिया**
(१९१०-१९६७)
समाजवादी राजकीय नेते. इंग्रजी भाषा, जात आणि पुरुष यांच्या वर्चस्वाच्या निर्मूलनावर भर.

**डॉ. अमर्त्य सेन**
(१९३३-) अर्थतज्ज्ञ आणि तत्वज्ञ.
व्यक्तीच्या कार्यक्षमतांचा विकास घडवण्यावर भर.



**चर्चा करा.**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी तुम्ही काय मदत कराल?

### न्याय

मानवासाठी सामाजिक व राजकीय जीवनात न्याय ही संकल्पना महत्वाची आहे. राज्यसंस्था एक सामाजिक-राजकीय संस्था आहे. न्याय ही संकल्पना प्राचीन आहे. सॉक्रेटिस यांनी न्याय हा राजकीय सद्‌गुण मानला. त्यांच्या मते, चांगला समाज व न्याय्य समाज या समानार्थी संकल्पना आहेत. प्लेटो यांच्या 'द रिपब्लिक' या ग्रंथामध्ये न्यायाची संकल्पना मांडली आहे. त्यांनी मनुष्याच्या गुणांपैकी न्याय हा एक गुण मानला. ॲरिस्टॉटल यांनी समाजात समता, प्रमाणबद्‌धता आणि संतुलन निर्माण केल्यास न्याय निर्माण होईल अशी व्याख्या केली. या न्यायाच्या व्याख्या ग्रीक काळातील आहेत. आधुनिक काळात न्यायाच्या व्याख्या नैसर्गिक न्याय, वैधानिक न्याय, सामाजिक न्याय आणि लिंगभावात्मक न्याय या पद्‌धतीने विकसित झाल्या आहेत.

जॉन रॉल्स यांच्या मते, कोणत्याही सामाजिक संस्थेचा 'न्याय' हा पहिला सद्‌गुण असला पाहिजे. साधनांची विपुलता नसल्यामुळे न्यायाची संकल्पना व्यक्तीच्या कृती आणि गरजांमधून निर्माण होते. साधनांचे वाटप करताना कोणाला काय व केव्हा मिळते हा न्यायातील महत्वाचा मुद्‌दा आहे.

### न्यायाचे प्रकार

(i) **नैसर्गिक न्याय :** मनुष्याच्या अस्तित्वाशी नैसर्गिक न्यायाची संकल्पना जोडली गेली आहे. मनुष्य निसर्गाचा घटक आहे म्हणून त्याला योग्य-अयोग्य, न्याय-अन्याय या संकल्पना समजू शकतात. नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर करण्यात आलेला न्याय हे सर्व व्यवस्थांचे अंतिम उद्‌दिष्ट आहे असे जगभरात मानले जाते. प्राचीन ग्रीक आणि रोमन

तत्ववेत्यांनी नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेचा पुरस्कार केला. कोणत्या गोष्टी न्याय्य आहेत व कोणत्या अन्याय्य हे कोणत्याही मनुष्यास सहजपणे समजू शकते म्हणून मानवनिर्मित कायद्याची गरज भासत नाही, अशी नैसर्गिक न्यायाची संकल्पना आहे.

(ii) **वैधानिक न्याय :** न्यायाच्या अमूर्त संकल्पनेची व्यावहारिक पातळीवर कायद्याच्या रूपाने अंमलबजावणी होते तेव्हा त्याला वैधानिक न्याय असे म्हटले जाते. जॉन ऑस्टिन यांनी कायदा हे न्यायाचे व दुष्कृत्य दडपून टाकण्याचे साधन आहे, असा विचार मांडला. न्यायाच्या तत्वाखेरीज कायदा केवळ दडपणुकीचे साधन बनतो, म्हणून कायदा ही संकल्पना न्यायावर अवलंबून आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

वैधानिक न्यायात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

(i) न्यायदान करणारी यंत्रणा निर्भीड, नि:पक्षपाती आणि स्वायत्त असणे.

(ii) न्यायदानाची प्रकिया तणावमुक्त वातावरणात पार पडणे.


(iii) न्यायदानासाठी निश्चित नियम आवश्यक असणे.

(iv) आरोपीला त्याच्यावर ठेवल्या गेलेल्या आरोपांची संपूर्ण माहिती असणे.

(v) आरोपांबाबत स्वत:ची बाजू मांडण्याचे स्वातंत्र्य आरोपीला असणे.

(iii) **सामाजिक न्याय :** सामाजिक न्याय म्हणजे वस्तू व सेवा यांचे रास्त व समतेच्या तत्त्वावर आधारित वाटप करणे. तसेच समाजातील कमकुवत गटांना त्यातील योग्य वाटा मिळणे आवश्यक असते. म्हणूनच सामाजिक न्यायाला वितरणात्मक न्याय असेही म्हणतात.

प्रक्रियात्मक न्याय आणि सामाजिक न्याय हे न्यायाचे दोन दृष्टिकोन आहेत. प्रक्रियात्मक न्यायाच्या संकल्पनेत कायदेविषयक प्रक्रियांचा समावेश होतो. कायद्याचा योग्य अर्थ लावून खटला चालवण्याची रास्त पद्धत अवलंबून एखाद्या प्रकारचा न्यायनिवाडा करणे व कायद्यासमोर सर्व समान आहेत असे मानणे हा प्रक्रियात्मक न्यायाचा अर्थ होतो. न्याय हा केवळ व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित नसून समाजाशी संबंधित आहे. रॉबर्ट नॉझिक यांनी प्रक्रियात्मक न्यायाचे विवेचन केले तर कार्ल मार्क्स, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि जॉन रॉल्स यांनी सामाजिक न्यायाचे विवेचन केले.




कार्ल मार्क्स (१८१८-१८८३)
जर्मन तत्त्वज्ञ

मार्क्सवादी विचारानुसार राज्यसंस्था ही कामगारवर्गाचे शोषण करण्याचे साधन असते. हे साधन भांडवलदारांच्या हाती असते. राज्यच कायदे करून राबवत असल्यामुळे स्वाभाविकच ते कायदे भांडवलदारांचे हित साधणारे असतात. मार्क्स यांच्या मते, साधनसंपत्तीच्या न्याय्य वितरणाची खात्री असावी यासाठी भांडवलशाही व्यवस्थेचे समाजवादी व्यवस्थेत रूपांतरण होणे आवश्यक मानले गेले. समाजवादी व्यवस्था 'आहेरे' वर्गाच्या मालमत्तेच्या हक्कापेक्षा 'नाहीरे' वर्गाच्या समतेच्या व न्यायाच्या हक्कांना प्राधान्य देते. म्हणून समाजवादी कार्यक्रम राबवणे म्हणजे न्याय अशी भूमिका मार्क्स यांची होती. मार्क्सवादी दृष्टिकोनातून न्यायालय समाजवादाशी बांधिलकी मानणारे असावे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

आहेरे वर्ग : आहेरे वर्ग म्हणजे असा वर्ग ज्याच्याकडे उत्पादन साधनांची मालकी आहे.

नाहीरे वर्ग : नाहीरे वर्ग म्हणजे असा वर्ग जो मुख्यत्वेकरून कामगार आहे.



जॉन रॉल्स
(१९२१-२००२)
अमेरिकन तत्वज्ञ

जॉन रॉल्स हे सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते, त्यांनी वितरणात्मक न्यायाचा सिद्धान्त मांडला. व्यक्तीला अनेक इच्छा असतात. त्यांपैकी कोणत्या इच्छा न्याय्य आहेत हे सांगणारा सामाजिक न्यायाचा सिद्धान्त रॉल्स मांडतात. 'अ थिअरी ऑफ जस्टिस' या पुस्तकात रॉल्स म्हणतात, की स्वातंत्र्य आणि समता यांना परस्परांपासून विलग करता येत नाही. न्याय खऱ्या अर्थाने न्याय्य होण्यासाठी, सर्वांना कायद्यांतर्गत समान हक्क मिळणे आवश्यक आहे, असे ते प्रतिपादन करतात. रॉल्स यांनी सामाजिक न्यायाची दोन तत्त्वे सांगितली आहेत : (अ) मूलभूत हक्क व कर्तव्ये समान असावीत. सर्वांत तळाशी असलेल्यांना फायदा होणार असलेली व्यवस्थाच न्याय्य मानली जावी. (ब) सर्व सार्वजनिक पदे सर्वांसाठी खुली असावीत. तसेच त्यांना प्राप्त करण्यासाठी सर्वांना समान संधी असावी हा रॉल्स यांचा वाजवी न्यायाचा सिद्धान्त आहे.

### न्यायाची भारतीय संकल्पना

भारतात विविध प्रकारच्या विषमता आहेत. उदाहरणार्थ, जातिव्यवस्था, पुरुषसत्ताक व्यवस्था इत्यादी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील दोन्ही व्यवस्थांमधील संरचना आणि मूल्यव्यवस्थेमध्ये बदल म्हणजे न्याय अशी व्याख्या केली. तसेच त्यांनी सामाजिक विषमतांच्या निर्मूलनाबरोबर साधनसंपत्तीच्या वितरणाशीही सामाजिक न्यायाचा सिद्धान्त जोडला. भारतीय संविधानात न्याय प्रस्थापित करण्याचे प्रक्रियात्मक न्याय आणि सामाजिक न्याय असे दोन मार्ग आहेत. हे शैक्षणिक, आर्थिक विकास आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांचे आर्थिक सक्षमीकरण यांद्वारे साध्य केले जाते. याची अंमलबजावणी खालील बाबींद्वारे केली जाते.

(अ) आरक्षणाचे धोरण

(ब) दुर्बल वर्गासाठी शिष्यवृत्ती, अनुदान, कर्ज, आरोग्य सेवा इत्यादी उपलब्ध करून देणे.

(क) मागासवर्गीयांचे शोषण करणाऱ्या भेदभावपूर्ण सामाजिक व आर्थिक प्रथांचे निर्मूलन करणे.

भारतीय संविधानाच्या स्वीकृतीच्या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या विचारांची नोंद घेणे महत्वाचे ठरेल. ते म्हणाले, '*जर आपल्याला लोकशाही केवळ नावापुरती नाही तर खऱ्या अर्थाने सांभाळायची असेल तर आपण काय करण्याची गरज आहे? आपली सामाजिक व आर्थिक ध्येय साध्य करण्यासाठी आपण प्रथमतः संविधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे.*' ते पुढे असेही म्हणतात, '*आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीदेखील बनवले पाहिजे. सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही उभी राहू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? स्वातंत्र्य, समता व बंधुता ही जगण्याची तत्त्वे म्हणून असणे गरजेचे आहे.*'

थोडक्यात न्याय आणि समता ही मूल्ये राज्यसंस्थेचा आधार आहेत.

**चर्चा करा.**

खालीलपैकी कोणत्या घटना समता व न्याय या तत्त्वाला छेद देणाऱ्या आहेत ते स्पष्ट करा.

(i) बस आणि रेल्वेमधील महिलांच्या जागांचे आरक्षण.
(ii) बस आणि रेल्वेमधील दिव्यांग व्यक्तींच्या जागांचे आरक्षण.
(iii) उत्पन्नावरील कर भरणे.
(iv) स्वस्त धान्य दुकानांमधील सवलती.

**चर्चा करा.**

घर सोडून पळून गेलेल्या मुलांच्या समस्यांवर चर्चा करा.

**करून पहा.**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या संकेतस्थळावर जाऊन दुर्बल वर्गांसाठी असलेल्या विविध धोरणांचा अभ्यास करा.



## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. राजकीय समतेचा ....... हा पाया असतो.
(लोकशाही, अधिकारशाही, लष्करी राजवट, राजेशाही)

२. जॉन रॉल्स हे ....... न्यायाचे पुरस्कर्ते होते.
(वितरणात्मक, राजकीय, आर्थिक, लिंगभावात्मक)

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाकरिता प्रत्येकाला संधी मिळणे आवश्यक आहे असे मानणारे समतेचे तत्त्व –

२. प्रत्येक नागरिकास राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार आहे असा समतेचा प्रकार–

३. आर्थिक शोषणाचा अभाव –

**(क) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**


१. भारतात अस्पृश्यता निवारणासाठी कायदे करण्यात आले. कारण.......

(अ) अस्पृश्यता ही राजकीय संकल्पना आहे.

(ब) अस्पृश्यता ही कायदेशीर संकल्पना आहे.

(क) कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विषमता नियंत्रित केली जाते.

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. लोकशाहीमध्ये समता नाकारली जाते.

२. समानता हे राजकीय ध्येय आहे.

३. सामाजिक लोकशाही ही राजकीय लोकशाहीचा पाया आहे.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. समता व न्याय

२. वैधानिक न्याय व सामाजिक न्याय

**प्र.५ आपले मत नोंदवा.**

सामाजिक समतेमध्ये जातिभेद अडथळा ठरतो.

**प्र.६ पुढील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

न्यायाची भारतीय संकल्पना स्पष्ट करा.

**उपक्रम**

महिलांना सुरक्षितपणे कामासाठी जाता येईल, यासाठी उपाय सुचवा.

***